# रोशन - भाग ४



'यूँही दिलने चाहा था रोना-रुलाना' (सुमन, 'दिल ही तो है') या गाण्याला रोशन यांनी किती सहजपणे साधीसोपी चाल दिली आहे, तर 'बार बार तोहे क्या समझाये' (रफी-लता 'आरतीमध्ये) हे गाणे किती अलंकृत केले आहे. ह्या गाण्यात लताचा वरच्या पट्टीतील मुखडा, त्यानंतर सुरांत पण द्रुतगतीत तालबध्द ठेका, सोबत हार्मोनिअम, व्हायोलिन्स आणि लगेचच ढोलकचा ताल, सगळं कसं अगदी श्रवणीय आहे. त्यानंतर लय बदलून गाण्याचे धृपद अलगद संथ गतीने येते. ह्या विलक्षण चालीला सितार सुंदर वापरली आहे.

तालातील बदल करून त्यांनी 'झिलमिल तारे करे इशारे' (सुरैय्या आणि मुकेश - 'माशुका') हे असेच एक गाणे आगळेवेगळे पण सुरेख झाले आहे. 'आ जा ए जानेवाले' (लता - 'चांदनी चौक') या गाण्यांत बासरी आणि सितार यांचे सूर बेमालूमपणे सुरेख पेरले आहेत. त्यानंतर 'रागरंग'मधील गाणी - दोन्ही लतानेच गायली आहेत. 'किसी नजरका मस्त इशारा' ह्या गाण्यातही बासरीचा सुरेल वापर करीत 'येही बहार है दुनियाको भूल जानेका' असे चतुराईने समेवर येणे सहजपणे केले आहे.

सर्वंकष विचार करता रोशन हे एक दैवी गुणवंत असे संगीतकार होते. त्यांच्या कर्तृत्वाचे चीज होत असतानाच आपल्याला मरण यावे असे ते आपल्या पत्नीकडे म्हणत असत. खरे तसेच घडले असे म्हणायला हरकत नाही. 'अनोखी रात' याचित्रपटासाठी एका गाण्याची चाल बांधत असताना त्यांच्या मित्राच्या घरी त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि ते खाली कोसळले. त्यानंतर ते घरी परतलेच नाहीत. १६ नोव्हेंबर १९६७ रोजी त्यांना मृत्यूने गाठले तेव्हा ते फक्त ५० वर्षांचे होते. 'ओ रे ताल मिले नदीके जल मे' (मुकेश) आणि 'महलोंका राजा मिला' (लता) ही दोन गाणी त्याच चित्रपटातील आहेत. वास्तवात त्यांची ही शेवटची गाणी अद्‌याप रेकॉर्ड झाली नाहीत, परंतु त्यांच्या पत्नी इरा यांनी ती गाणी नंतर ध्वनीमुद्रित केली. त्या दिवशी रेकॉर्डिंग स्टुडिओ अश्रूपूर्ण नेत्रांनी भारावून गेला होता.

नंतर ३४ वर्षांनी रोशन यांच्या प्रतिभावंत संगीतकार सुपुत्राला - राजेश रोशन यांना (२००० साली प्रदर्शित झालेल्या) 'कहो ना प्यार है' ह्या चित्रपटासाठी दुसरे फिल्मफेअर अवॉर्ड मिळाले. स्टेजवर अवॉर्ड घेण्यासाठी गेले असताना ते म्हणाले की 'पुन्हा हे अवॉर्ड घेण्यासाठी मला २५ वर्षे वाट पहावी लागली.' बरोबर पाव शतक आधी १९७५ साली प्रदर्शित झालेल्या 'ज्युली' चित्रपटासाठी त्यांना पहिले फिल्मफेअर अवॉर्ड मिळाले होते. 'ये राते नयी पुरानी' आणि 'दिल क्या करे जब किसीसे' ही दोन गाणी त्याच चित्रपटातील आहेत. राजेश रोशननी त्यानंतर 'का करू सजनी' (स्वामी') आणि 'ये जो थोडेसे पैसे' ('पापा कहते है') ही दोन सुंदर गाणी दिली.

परंतु २००० साली उत्कृष्ट पार्श्वगायकाचा पुरस्कार 'कहो ना प्यार है' मधील 'ए आ ये आ ओ आ ये आ ..... इक पल का जीना' ह्या गाण्यासाठी लकी अलीला मिळाला.

दैवदुर्विलास ! दुसरे काय ? काळ बदलतोय हेच खरे.

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician's role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book "Talat Mahmood, The Velvet Voice" was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com